## संपादकीय

### काळजी घ्या..

पावसाळी पर्यटनावर अनेक ठिकाणी बंदी घालण्यास आणि त्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना जाहीर होण्यास सुरुवात झाली आहे. यासंबंधीच्या बातम्या प्रसार माध्यमांत प्रसिध्द होत आहेत. वन्यजीव विभागाकडून भीमाशंकर अभयारण्याच्या वाटा सप्टेंबरपर्यंत बंद करण्यात आल्या आहेत. त्र्यंबकेश्वर परिसरातील विविध ठिकाणांसाठी वनविभागाने मार्गदर्शक सूचना प्रसिध्द केल्या आहेत. राज्यातील पर्यटनस्थळे सुरक्षित करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत. ज्या क्षेत्रांवर अशा उपायोजना करणे शक्य नाही, अशी पर्यटनस्थळे तूर्तास बंद करण्याचे आदेश पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी काढले आहेत. अशी वेळ प्रशासनावर का आली? याचे उत्तर गेल्या काही दिवसांतील काही दुर्दैवी घटनांनी दिले आहे. पाण्याचा, समुद्राचा आणि धबधब्यांच्या खोलीचा अंदाज न आल्याने काही पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. अतिधाडस, निसर्गाला गृहीत धरण्याच्या वृत्तीत होत चाललेली वाढ, मित्रांना काहीतरी करून दाखवण्याची खुमखुमी आणि फाजील आत्मविश्वास ही त्यामागची काही कारणे आहेत. समाज माध्यमांवर रिल करून टाकणे आणि वाहवा मिळवणे याची त्यात आणखी भर पडली आहे. समाज माध्यमांचा प्रभाव वाढल्यापासून अशा ठिकाणांना भेटी देणाऱ्या हौशानवशा-गवशांची गर्दी वाढत आहे. खरे तर निसर्गाच्या सान्निध्यात काही काळ घालवणे, त्याची विविध रूपे अनुभवणे, त्यानिमित्त पशुपक्ष्यांचा दूरस्थ सहवास अनुभवून ताजेतवाने होणे हा एक उद्देश असावा, असे तज्ज्ञ आणि जाणत्यांना अपेक्षित आहे. अशी स्थळे परिचित नसतात. त्या वाटा अनवट असतात. त्यामुळे अशा ठिकाणी स्थानिकांच्या सूचनांचा आदर करणे किंवा मार्गदर्शकासमवेत स्थळदर्शन करणे हिताचे ठरते. तथापि पर्यटनस्थळी जाऊन प्रचंड गोंधळ घालणे, मद्य पिऊन अंगविक्षेप करून नाचणे आणि हुल्लडबाजी करण्याकडेच कल वाढलेला आढळतो. परिणामी दुर्घटना घडून अनेकांचे मृत्यू ओढवतात. अनेक ठिकाणांवर बंदी घातली जाते. मार्गदर्शक सूचनांचे फलक लावलेले आढळतात. त्याची दखल किती पर्यटक घेतात? गर्दी व्यवस्थापनाचा विचार करणे सरकारचे कर्तव्य आहे. ते सरकारने पार पाडायला हवे. माऊंट एव्हरेस्टपासून विविध पर्यटनस्थळांवर पर्यटकांच्या बेशिस्तीमुळे साचणारा कचरा हा चिंतेचाच विषय आहे. सामाजिक भान हरवत चालल्याची ही लक्षणे मानावीत का?

# शताब्दी वर्ष : डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पहिले संघटन म्हणजे बहिष्कृत हितकारिणी

## शताब्दी वर्ष : डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पहिले संघटन म्हणजे बहिष्कृत हितकारिणी सभा होय.

मित्र हो,



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ ला बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली होती. त्यांनी स्थापन केलेल्या पहिल्या संघटनेच्या शताब्दी वर्ष, वर्धापनदिनानिमित्त आपण सर्वांना कोटी कोटी सदिच्छा!

९ मार्च १९२४ ला दामोदर हाल मुंबई येथे केंद्रीय संस्थेच्या स्थापनेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बैठक आयोजित केली होती. जेणेकरून अस्पृश्यांच्या समस्यांचे अनुषंगाने आपले दु:ख सरकारपुढे मांडता येतील. त्या संस्थेचे नांव बहिष्कृत हितकारिणी सभा असे ठेवण्यात आले होते. त्या बैठकीत बाबासाहेब आंबेडकरांनी संदेश दिला होता की, लोकांना सुशिक्षित करा, त्यांच्यात आपल्या हिन अवस्थेबद्दल चीड उत्पन्न करा आणि त्यांची संघटना निर्माण करा. अर्थात,(एर्वीलरींश, -सळींरींश रपव जीसरपळीश) : सुशिक्षित करा, संघर्ष (चेतवा) करा आणि संघटीत करा. ही त्रिसूत्री त्या बहिष्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य ठरले. याप्रमाणे आपणांस शिक्षणच यासाठी घेणे अपेक्षित होते की, संघर्ष कशासाठी करायचा? हे समजून घ्यायचे होते. एकदा संघर्ष कशासाठी करायचा? हे जर जनतेला माहीत पडले तर लोकांना संघटीत व्हायला वेळ लागणार नाही. करिता ज्यांच्यासाठी आपणांस संघर्ष करायचा आहे, त्याचे कारण आपणांस स्पष्टपणे माहीत असणे आवश्यक आहे. त्यासाठी संस्था कायदा १८६० च्या ददख अंतर्गत २० जुलै १९२४ ला बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना करून रितसर नोंदणी करण्यात आली.

बहिष्कृत हितकारिणी सभेच्या व्यवस्थापन समितीचे चेअरमन : डॉ. बी. आर. आंबेडकर, सचिव : एस. एन. शिवतरकर, अध्यक्ष : सर चिमनलाल हरिलाल सेटलवाड (एल एल डी), उपाध्यक्ष : नेयेर निस्सीम व जे. पी. व्यास तर कोषाध्यक्ष : एन. टी. जाधव आणि रुस्तुमजी जिनावाला, जी. के. नरिमन, डॉ. आर. पी. परांजपे, डॉ. व्ही. पी. चव्हाण व बी. जी. खेर (सॉलिसिटर) यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली होती.

उद्देश : वंचित वर्गामध्ये शिक्षणाचा प्रचार प्रसार व्हावा म्हणून विद्यार्थ्यांसाठी आवश्यकतेनुसार वस्तीगृहे, ग्रंथालये, सामाजिक केंद्र आणि अभ्यासवर्गाची निर्मिती करणे अपेक्षित होते. तसेच आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी औद्योगिक आणि कृषी विद्यालय स्थापन करणे व आपल्या समस्यांचे निवेदन सादर करणे अपेक्षित होते. यासाठी अ) सभेने जागा विकत, भाड्याने, लिजवर घेतले पाहिजे. सदरील जागेवर ब) बांधकाम, दुरुस्ती, बदल करण्याचे अधिकार संस्थेकडे राखीव ठेवण्यात आले होते. क) विक्री, सुधारणा, विकास, अदलाबदल, लीज, करारान्वये गहाणखत नष्ट करणे, व्यवस्थित करणे या सर्वांचे व्यवस्थापन करणे अपेक्षित होते. ड) करिता देणग्या स्विकारणे, मिळकत स्विकारणे जेणेकरून सुसंगत कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न केले जाऊ शकतील. इ) संस्थांतर्गत हस्तांतरणाचे आवश्यकतेनुसार निर्णय घेतले जातील.

ही सभा म्हणजे बहिष्कृत हितकारिणी सभा होय ज्यात बोर्ड ऑफ ट्रस्टीज, कौन्सिल ऑफ मॅनेजमेंट व बोर्ड ऑफ कंट्रोल मध्ये अनुक्रमे दहा, सात व पंधरा सदस्य असावेत असे ठरले होते. ज्या सदस्यांना कुठलेही आर्थिक लाभ घेता येणार नव्हते.

सदस्यत्वासंबंधी नियमावली : १८ वर्षावरील कुठल्याही स्त्री किंवा पुरुषांना सभेचे सदस्य होता येईल. ज्या व्यक्तींना सदस्य व्हायचे त्यांनी तसा अर्ज दिला पाहिजे. सदस्यत्वाचा अर्ज नाकारायचे की स्विकारायचे ते ठरवायचे अधिकार कौन्सिल ऑफ मॅनेजमेंटने राखून ठेवले होते. बहिष्कृत हितकारिणी सभेच्या विरोधात गैरवर्तन करणा-या सदस्यांस उपस्थित सदस्यातील तीन चतुर्थांश मताधिक्याने अपात्र ठरविण्याचा अधिकार त्या जनरल बॉडीला असेल.

सदस्यांचे वर्गीकरण : १) संरक्षक : आश्रयदाते (झरींपी) : वार्षिक ३००० रुपये एकदाच किंवा हप्त्या हप्त्याने जमा करने अपेक्षित होते. २) समर्थक ( र्डीीिशीी) : वार्षिक २००० रुपये, ३) सहानुभूतीनदार (ड्ढीिंहळीशीी) : वार्षिक १००० रुपये, ४) आजीवन सदस्य (डळषश चशालशीी) : ५०० रुपये, ६) सहायक सदस्य (-ीीलळरींश चशालशीी) : २०० रुपये, ७) सामान्य सदस्य (जीवळपरी ू चशालशीी) : अ) २५ रुपये, ब) १० रुपये, क) ५ रुपये, ड) दोन रुपये, इ) एक रुपया या प्रमाणे निधी देणा-या सर्व व्यक्तींना या संस्थेचे सदस्य होता येईल. अशाप्रकारे ही सभा चालविण्यासाठी आश्रयदाते, समर्थक, सहानुभूतीनदार, आजीवन सदस्य, सहाय्यक सदस्य तसेच सामान्य सदस्यांची सुद्धा आवश्यकता असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अधोरेखित केले आहे.

या सभेच्या १६ पैकी ४ ट्रस्टी हे मुंबईचे असावेत. कुठल्याही कारणाने रिक्त झालेली जागा ही तीन चतुर्थांश मताने सहा महिन्यात भरण्यात यावी. या सभेतील ट्रस्टी हे महार, मांग, चांभार आणि धेड समाजातील असावेत. चार कोकण, दोन गुजरात, दोन कानरीज आणि उर्वरित आठ सदस्य हे मुंबई प्रांतातील इतर जिल्ह्यातून निवडावेत. स्थायी आणि अस्थायी मालमत्ता ही सभेच्या मालकीची असेल.

कौन्सिल ऑफ मॅनेजमेंट ने वार्षिक अंदाजपत्रक मंजुरीसाठी ट्रस्टकडे पाठवावे. गरज भासेल तेव्हा पुरवणी अंदाजपत्रक सादर करावे. मंजूरी मिळाल्याबरोबर त्याची अंमलबजावणी करावी. ट्रस्टींनी कमीत कमी वर्षातून एकदा तरी भेटावे. नवीन वर्ष सुरू झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत भेटावे. अंदाजपत्रकाच्या संबंधित बोर्ड ऑफ ट्रस्टीजच्या बैठकीला कौन्सिलचे चेअरमन, महासचिव आणि कोषाध्यक्ष यांना उपस्थित राहता येईल. मात्र मत व्यक्त करता येणार नाही. पुढील सभेची किंवा सर्वसाधारण सभेची एक महिना आधी पूर्वसूचना दिली जाईल. सर्व प्रकारच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी ट्रस्टींची असेल. महासचिवांनी वितरित केलेल्या सूचनांवर मत व्यक्त करता येईल. सर्व सुचनांची नोंद ही नोंदवहीत असेल. प्रत्येक बैठकीला एका ट्रस्टींची चेअरमन म्हणून नियुक्ती केली जाईल. जे त्या बैठकीच्या अहवालावर सह्या करतील. महासचिवांनीच सर्व अहवाल लिहिला पाहिजे.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेली पहिले संघटन म्हणजे बहिष्कृत हितकारिणी सभा होय. याचा आधार घेऊन बहिष्कृत समाजातील अनेकांनी संस्था, संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न केला. मात्र ते चालविण्यामध्ये फारसे यशस्वी झाल्याचे पहायला मिळत नाही. एवढेच नव्हे! तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या संस्था, संघटनांची सुद्धा त्यांच्या अनुयायांनी तशीच वाताहात केल्याचे पहायला मिळत आहे. ही या चळवळीची शोकांतिकाच म्हणावी लागेल. ही आपल्या अप्रामाणिकतेची पावतीच होय. या सर्व बाबींचा विचार करून २० जुलै १९४२ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर परिषदेत वरील त्रिसूत्री संदेशाचा विस्तार करताना सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटीत व्हा, आत्मविश्र्वास बाळगा आणि धीर सोडू नका असा पंचसूत्री संदेश दिला होता. याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रामाणिकपणे शिस्तबद्ध मार्गक्रमण करावे. आपण सर्वांना या शताब्दी वर्धापनदिनानिमित्त कोटी कोटी सदिच्छा व्यक्त करून थांबतोय.



**जय भीम!**
**जय पिपल्स व्हाईस!!**
**जय भारताचे संविधान!!!**

लेखक : मेश्राम बी. बी., संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, राष्ट्रीय कौन्सिल मेंबर ऑफ दि आल इंडिया नाग असोसिएशन (आईना) संपर्क : ९४२१६७८६२८

पान १ वरुन

## गोपाळकाल्याने आषाढी यात्रेची

गोपाळपुरात दाखल झाले व श्री ज्ञानेश्र्वर महाराजांच्या तसेच श्री तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले मंदिराजवळ पालख्या विसावल्या पालखीचे संत सोपान काका संत मुक्ताबाई संत नामदेव महाराज संत गोरोबा संत एकनाथ महाराज संत निवृत्तीनाथ महाराज संत निळोबाराय संकेश्र्वर देवस्थान यांच्यासह अन्य संतांच्या पालख्यांचे व दिंड्यांचे गोपाळपुरात आगमन झाले

तत्पूर्वी गोपाळपूर येथील श्रीकृष्ण मंदिरात पहाटे २.३० वाजता विश्र्वस्तांच्या हस्ते पूजा करण्यात आली व पूजा झाल्यानंतर पहाटे ३.१५ वाजता श्रीकृष्ण मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले व भाविकांसाठी मोठ्या श्रद्धेने श्री गोपाळ कृष्णाचे दर्शन घेऊन मंदिराला प्रदक्षिणा घातली तसेच एकमेकांना प्रेमाने लाह्यांचा काला भरून गळाभिड घेतली व श्रीकृष्ण मंदिर समितीच्या वतीने प्रसाद म्हणून लाह्यांच्या काल्यांचे वाटप करण्यात आले

गोपाळपूर ग्रामपंचायत च्या वतीने सरपंच उज्वल बनसोडे ग्रामसेविका ज्योती पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्य यांनी पालख्यांचे व दिंड्यांचे स्वागत केले गोपाळपूर ग्रामपंचायत च्या वतीने स्वच्छ पिण्याचे पाणी विद्युत व्यवस्था हिरकणी कक्ष प्लास्टिक संकलन केंद्र तात्पुरते स्वच्छालय निवास शेड आदी सुविधा वारकरी भाविकांसाठी उपलब्ध केल्या होत्या यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीने चौक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या सोहळ्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे उपविभागीय यादी पोलीस अधिकारी अर्जुन भोसले तहसीलदार सचिन लंगोटे गटविकास अधिकारी सुशील संसारे तालुका आरोग्य अधिकारी डॉ एकनाथ बोधले यांच्यासह संबंधित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते गोपाळपूर येथील गोपाल कृष्ण मंदिर समितीच्या वतीने मंदिरात आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती उपस्थित अधिकाऱ्यांचा सत्कार गोपाळ कृष्ण मंदिर समितीच्या वतीने गोपाळकृष्ण मंदिर समितीचे अध्यक्ष दिलीप गुरव यांच्या शुभहस्ते करण्यात आला

संत देव भेटीचा सोहळा

गोपाळकाला झाल्यानंतर सर्व मानाच्या पालख्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दाखल झाल्यावर सर्व संतांच्या पादुका विठ्ठल दर्शनासाठी नेण्यात आल्या यावेळी देवांची आणि संतांचे अनुपम भेट घडवून आणण्यात आली व श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतल्यानंतर हा संतदेव भेटीचा सोहळा पार पडला यानंतर पालख्या परतीच्या मार्गावर रवाना झाल्या तत्पूर्वी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य अँड माधवी निगडे संभाजी शिंदे प्रकाश महाराज जवंजाळ कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांनी पादुकांचे पूजन व मानाच्या पालखीचे मानकरी यांचे उपरणे श्रीफळ व हार देऊन सत्कार केला यावेळी यांच्या संबंधित समितीचे कर्मचारी उपस्थित होते

## विधान परिषद आ.योगेशआण्णा

अक्कलकोटकरांचे आभार मानले आणि माझा निधी सुद्धा तुमच्या गोगावला नक्की देईन असे आश्र्वासन सरपंच सौ वनितताई सुरवसे यांना दिले. गोगांव गावामध्ये आपला आमदार निधी वापरण्याचे भाग्य मला मिळेल आपण नक्कीच माझ्या गावाला सुद्धा मदत कराल अशी आशा सौ सुरवसे यांनी व्यक्त केली.

यावेळी, नगरसेविका रंजनाताई टिळेकर,, चेतन दादा टिळेकर, मधुकर सुरवसे,रमेश जगताप, आकाश सुरवसे, राहुल जगताप, अशोक साळुंके,सुनील जगताप, विनायक जगताप, राजाराम जगताप, शामल गायकवाड, सुनीता जगताप, विद्या भवर, निर्मला जगताप, माया सुरवसे, उर्मिला नीळ, विद्या लोंडे,सारिका जगताप,प्रियांका साळुंके,अनिल तावरखेड व इतर मान्यवर उपस्थित होते.

## श्री.वटवृक्ष मंदिरात श्रद्धेय

११ वाजता महाराजांची नैवेद्य आरती संपन्न झाली. यानंतर सर्व स्वामी भक्तांना देवस्थानच्या वतीने शीरा प्रसाद वाटप करण्यात आले. स्वामी भक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे आरतीनंतर सर्व स्वामी भक्तांना टप्या टप्याने दर्शनास सोडण्यात आले. दुपारी १२ ते ४ या वेळेत सर्व स्वामी भक्तांना देवस्थानच्या मैंदर्गी गाणगापूर रोडवरील भक्त निवास येथे भोजन महाप्रसाद देण्यात आले होते, हजारो स्वामी भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. आज दिवसभरात गुरूपौर्णिमेनिमीत्त आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे, अक्कलकोट संस्थानचे श्रीमंत मालोजीराजे भोसले राजासाहेब व कुटुंबीय सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, हातकणंगले मतदारसंघाचे खासदार धैर्यशील माने, सोलापूरचे उद्योगपती गणेश कोळी व परिवार, सचिन पवार व परिवार तथा मित्रमंडळी, शिवराज म्हेत्रे, माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचे चिरंजीव संजीव कुमार पाटील आदी मान्यवरांसह जवळपास ४ लाख स्वामी भक्तांनी श्रींचे दर्शन घेतले.

सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होणेकरिता मंदिर समितीचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक महेशजी इंगळे, पुरोहित मंदार महाराज पुजारी यांच्या अधिपत्याखाली व तहसीलदार विनायक मगर, डीवायएसपी विलास यामावार व पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व स्वामी भक्तांचे दर्शन कोणतेही अनुचित प्रकार न घडता सुरळीतपणे पार पडले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्र्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, श्रीशैल गवंडी, मंगेश फुटाणे, गिरीश पवार, संजय पवार, स्वामीनाथ लोणारी, सागर गोंडाळ, प्रसाद सोनार, अमर पाटील, महेश मस्कले, पवन पवार, अविनाश क्षीरसागर, प्रसाद सोनार, संतोष पराणे, चंद्रकांत गवंडी व देवस्थानचे कर्मचारी व सेवेकऱ्यांनी

तसेच पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, गोपनीय खात्याचे धनराज शिंदे, गजानन शिंदे व उपस्थित सर्व पोलीस प्रशासनाने परिश्रम घेतले.

## राज्यात मुसळधार पावसाची


राज्यात पूरपरिस्थिती निर्माण झाल्यास अशा क्षेत्रात वाहतूक बंद करावी आणि ती पर्यायी मार्गावर वळवावी. हवामान खात्याशी समन्वय साधावा, त्यांच्याकडून देण्यात येणारे विविध अलर्टस् (इशारे), माहिती यासंदर्भात नागरिकांना जलद गतीने अवगत करावे, पूरग्रस्त क्षेत्रात अन्नधान्य, औषधे आणि साह्यकार्य साहित्य उपलब्ध करून ठेवावे. पर्यायी निवारास्थाने आणि राहण्यासाठी ठिकाणे उपलब्ध करून ठेवावीत, पूरस्थिती निर्माण झाल्यास जनावरांच्या स्थलांतराची व्यवस्था तयार ठेवावी, असं प्रशासनाला सांगण्यात आल्याचं मुख्यमंत्री कार्यालयाने म्हटलं आहे.दरम्यान, राज्यातील काही जिल्ह्यात मागील २४ तासांपासून मुसळधार पाऊस सुरु आहे. या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक शहरांमध्ये पाणीदेखील साचले आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे. महत्त्वाचे म्हणजे, हवामान विभागाने आजसुद्धा राज्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. राज्यातील रायगड, रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## मिरज शासकीय प्रौढ अपंग

प्रवेशासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नसून प्रवेश अर्ज परिपूर्ण भरून छायाचित्रासह संस्थेकडे पाठवावेत किंवा समक्ष भरून द्यावेत. प्रवेश अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, दिव्यांगत्व असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला व आधार कार्ड यांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानंतर तज्ज्ञ समितीद्वारे मुलाखती घेऊन प्रवेश देण्यात येईल.प्रवेश अर्ज व अधिक माहितीसाठी अधीक्षक, शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, टाकळी रोड, म्हेत्रे मळा, गोदड मळ्याजवळ, ता. मिरज, जि. सांगली-४१६४१० (दूरध्वनी क्रमांक ०२३३-२२२२९०८, ९९२२५ - ७७५६१, ९५९५६-६७९३६) येथे संपर्क साधावा. जास्तीत जास्त दिव्यांगानी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अक्कलकोट तालुक्यातील रस्त्यांच्या

त्यामुळे सतत या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मंजूर झालेले रस्ते आणि मिळालेला निधी पुढीलप्रमाणे आहे. बोरामणी ते खडकी दावलमलिक या तीन किलोमीटर रस्त्यासाठी ४ कोटी ७१ लाख रुपये, कासेगाव ते खडकी या तीन किलोमीटर रस्त्यासाठी ४ कोटी ९५ लाख रुपये, अक्कलकोट ते मातनहळळी मार्गे गुरववाडी या आठ किलोमीटर रस्त्यासाठी १३ कोटी २ लाख रुपये, शिरवळ ते बणजगोळ या सहा किलोमीटर रस्त्यासाठी ८ कोटी २४ लाख रुपये, कडबगाव ते दोड्याळ या चार किलोमीटर रस्त्यासाठी ५ कोटी ६१ लाख रुपये, करजगी ते हंद्राळ या चार किलोमीटर रस्त्यासाठी ७ कोटी ४६ लाख रुपये, अंदेवाडी (बु) ते कुंभार वस्ती या तीन किलोमीटर रस्त्यासाठी ५ कोटी ६५ लाख रुपये, हंजगी ते हालचिंचोळी या तीन किलोमीटर रस्त्यासाठी ४ कोटी २७ लाख रुपये, कल्लकर्जाळ फाटा ते कल्लकर्जाळ ते कोर्सेगाव या चार किलोमीटर रस्त्यासाठी ७ कोटी ९१ लाख रुपये अशा एकूण नऊ रस्त्यासाठी ६१ कोटी रुपये एवढ्या निधीसाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. याला जोडूनच या सर्व रस्त्यांसाठी दहा वर्षाच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च ५ कोटी एवढा अपेक्षित आहे. इतिहासात पहिल्यांदाच अक्कलकोट विधानसभेतील ग्रामीण रस्ते हे सिमेंट काँक्रीटचे बनतील आणि त्यातून सुखमय दळणवळण प्रस्तावित होईल.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कीटकनाशक फवारताना काळजी घ्या कृषी सहाय्यक : संतोष किंगरे



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

बुलढाणा / राहुल साबळे : चिखली तालुक्यातील मौजे आसोल बु व अंत्रीखेडेकर व मेरा खुर्द येथे सध्या सोयाबीन तूर पिकावर फवारणीचे सुरू आहे त्यामध्ये शेतकऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी व कोणते कपडे घालावे याविषयी असोला बु अत्री खेडेकर व मेरा खुर्द येथील कृषी सहाय्यक संतोष किंगरे यांनी असोल बु अंत्री खेडेकर व मेरा खुर्द येथे शेतकऱ्यांना कृषी सहाय्यक यांनी प्रात्यक्षिक व घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले यामध्ये असोला बु येथे मधुकर गवई अमोल सुर्वे संदीप सुर्वे नवले व इतर शेतकरी हजर होते तर अंत्री खेडेकर येथील मार्गदर्शन सभेला रतन पेंढारकर मोरे फौजी राजाराम माळेकर रामदास खेडेकर भागवत माळेकर विठ्ठल गावंडे इत्यादी शेतकरी हजर होते शेतकऱ्यांनी फवारणी करताना योग्य ती काळजी घ्यावी अशी माहिती मेरा खुर्द असोला बु अंत्री खेडेकर येथील कृषी सहाय्यक संतोष किंगरे यांनी आपल्या मार्गदर्शनातून शेती विषयक माहीती दिली आहे

# वागदरी येथील श्री.परमेश्वर पर्व आराधना पालखी महोत्सव सोहळ्याचे नागणसूर विरक्तमठाचे डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामीजी निमंत्रण



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

वागदरी/ अक्कलकोट/प्रतिनिधीः यावर्षी सप्टेंबर १९ आणि २० रोजी होणाऱ्या वागदरी ग्रामदैवत श्री परमेश्वर यांचे पर्व पालखी महोत्सवामधे सहभागी होऊन भक्तांना महाप्रसाद बरोबर ज्ञान प्रसाद देण्यासाठी महोत्सवात सहभागी होण्यासाठी वागदरी श्री परमेश्वर पंच कमिटीचे सदस्यांनी रविवारी गुरुपौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर नागणसूर विरक्तमठचे डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामीजी आणि सोलापूर किरीट मठाचे स्वामीनाथ महास्वामीजी आणि वागदरी विरक्त मठाचे शिवलिंगेश्र्वर महास्वामीजी यांना निमंत्रण दिले.

नेहमीप्रमाणे रविवारी गुरुपौर्णिमेनिमित्त तालुक्यातील वागदरी येथील ग्रामदैवत परमेश्र्वर पर्व पंच कमिटीचे सदस्यांनी वाहनाने जाऊन महास्वामीजींना अधिकृत निमंत्रण दिले. कार्यक्रमाचा आराखडा ऐकून नागणसूरचे स्वामीजी या महोत्सवाला नक्की येईन,असे सांगुन नागणसूर मठाचे भक्तांच्या सहकार्याने निर्माण होत असलेले अडीच कोटी रुपयाचे सांस्कृतिक भवनाचे कामगारी दाखविले व दसऱ्याच्या वेळी नागणसूर मध्ये होणाऱ्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी वागदरीच्या पंचकमितीला आमंत्रण दिले.

समितीचे सदस्य जागतिक लिंगायत महासभा वागदरीचे अध्यक्ष शरणप्पा मंगाणे वागदरीचे सरपंच श्रीकांत भैरमडगी यांनी महास्वामीजींचे पाद पूजा करून सत्कार केले .घाळय्या मठपती , शरणप्पा मंगाणे, अशोक पोमाजी, कमिटी चे सचिव शांतेश्र्वर कोटे, सोलापूर जिल्हा जागतिक लिंगायत महासभेचे अध्यक्ष शिवानंद गोगाव , सोमणप्पा खैराटे, परमेश्र्वर यमाजी, शिवशरण बिराजदार , हणमंत सलगरे, सिद्धराम बिराजदार, सुरेश पोमाजी,हणमंत ठोंबरे, अनिल पुरंत,

अक्कलकोट प्राथमिक शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष बसवराज खिलारी, धर्मराज बिराजदार निवृत्त विस्तार अधिकारी धर्मा प्रचंडे, श्रीशैल फुलारी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# राज्य एसटी महामंडळाच्या शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

कळंब/सुधाकर रणदिवे : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांची वर्षा निवासस्थानी युवा सेना राज्य समन्वयक तथा शिवसेना धाराशिव जिल्हा निरीक्षक नितीन लांडगे यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळ यांचे शिष्टमंडळ यांनी मुंबई येथे भेट घेतली, ही भेट दिनांक २९ जून रोजी कळंब येथे कार्यरत असलेले एसटी कर्मचारी सच्चिदानंद पुरी यांनी टॉवरवर चढून केलेल्या आंदोलनादरम्यान मुख्यमंत्री आणि पुरी यांचे मोबाईल फोनवरून बोलणे लांडगे यांनी करून देऊन आंदोलन करते पुरी यांनी मुख्यमंत्री यांच्या शब्दाखातर आंदोलन स्थगित करून भेट घेण्याचे ठरले आणि ठरल्याप्रमाणे मुख्यमंत्री यांची भेट झाली सदरील भेटीदरम्यान एसटी कर्मचाऱ्यांचे विविध विषय मार्गी लावण्याचे आव्हान शिष्टमंडळातर्फे करण्यात आले, या आव्हानाला मुख्यमंत्री यांनी पूरक आणि प्रशासकीय चर्चेतून मार्ग काढणार असल्याचे वचन सर्व कर्मचाऱ्यांना व शिष्टमंडळ यांना दिले. तसेच सदरील भेटीचे पूर्व नियोजन करणारे मा. नितीनजी लांडगे यांचे देखील आभार एसटी कर्मचाऱ्यांनी मानले, यावेळी उपस्थित संजय मुंदडा, युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश जगताप, युवा सेनेचे जिल्हा सरचिटणीस निखिल घोडके समवेत युवा सैनिक उपस्थित होते.

# २५ जुलै रोजी सासवड येथील शिवतीर्थावर रिपाइंचे निदर्शने आंदोलन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुरंदर/प्रतिनिधी : जेजुरी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा अधिकाराचा गैरवापर करुन व कर्तव्यात कसूर करुन , काढून टाकणार्या मनुवादी अधिकार्यांवर कारवाई करण्यात यावी, व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुताळयाचे काम नवीन जागेत तात्काळ सुरु करण्यात यावे, या मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले यांच्या आदेशानुसार, व पक्षाचे जेष्ठ नेते माजी आमदार अँड एल टी सावंत, यांच्या अध्यक्षतेखाली ,व रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश अध्यक्ष डॉ सतीश केदारी , पुणे जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत कदम, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाच्या महिला आघाडीच्या वरिष्ठ प्रदेश उपाध्यक्षा संगितताई आठवले, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा संघमित्रा ताई गायकवाड व रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळस, यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार दि. २५ / ७ / २०२४ रोजी सकाळी ठिक ११ वाजता सासवड तालुका पुरंदर जिल्हा पुणे येथील सासवड नगरपालिके समोरील शिवतीर्थावर जाहीर निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश संघटक सचिव गोविंद जगताप व रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे पश्र्चिम महाराष्ट्राचे पारधी आघाडीचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार यांनी दिली,



सदर आंदोलनास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे राज्याचे उपाध्यक्ष दिपक ओव्हाळ, सुभाष सहजराव, राज्याचे संघटक सचिव स्टीवन जोसेफ , पुणे शहर अध्यक्ष, किशोर पडांगळे राज्याचे सचिव बाळासाहेब जोगदंड, तुषार कांबळे, अमर कनोजिया पश्र्चिम महाराष्ट्राचे नेते शकुरभाई शेख, सत्तारभाई शेख, जिल्ह्याचे नेते, काळूराम कांबळे, भोर तालुक्याचे अध्यक्ष संतोष जाधव, खेड तालुका अध्यक्ष, विशाल कांबळे, यासह पुणे जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचे व श्रमिक ब्रिगेडचे विविध पदाधिकारी सदर आंदोलनात सहभागी होणार आहेत, तरी लोकनेते नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या पुरंदर तालुक्यातील सर्व पदाधिकारी यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भिम सैनिकांनी भिमानुयायांनी तसेच विविध पक्ष सामाजिक संघटना यांच्या पदाधिकारी यांनी आपापल्या पक्ष संघटनेच्या वतीने, या आंदोलनात सहभागी होऊन , लेखी पाठींबा द्यावा असे आवाहनही, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश संघटक सचिव गोविंद जगताप व पश्र्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार यांनी केले आहे,

सदर आंदोलनाचे आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले यांनी केले आहे, सदर आंदोलन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेड यांच्या वतीने करण्यात येत असले तरी, हे आंदोलन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा जातीय द्वेषातून, सामाजिक शांतता भंग होणार नाही, जातीय तेढ निर्माण होणार नाही, कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही, धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत, व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना होणार नाही, यांची दक्षता न घेता, तालुक्यातील लोकप्रतिनिधी, समाजसेवक, सामाजिक संघटना पत्रकार व प्रशासन यांच्यात बैठक न घेता, अधिकाराचा गैरवापर करून, कर्तव्यात कसूर करुन, पुरंदर तालुक्यातील मनुवादी अधिकार्यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल असलेल्या द्वेषातून महामानवाचा पुतळा काढून टाकला आहे, त्यामुळे या प्रवृतीचा जाहीर निषेध करण्यासाठी, व मीही बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा पाईक आहे, यासाठी विविध पक्ष संघटनेने या आंदोलनात सहभागी झाले पाहिजे असे आंदोलनाचे आयोजक विष्णूदादा भोसले यांनी सांगितले

# आषाढी यात्रेनिमित्त शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नागेशदादा फाटे यांच्या वतीने दोन दिवस अन्नदान




**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेस शहर चंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापारी विभागाचे प्रदेशाध्यक्ष मा. नागेश दादा फाटे आणि फाटे उद्योग समूह यांच्या वतीने आषाढी यात्रेनिमित्त आलेल्या भाविकांसाठी दशमी या दिवशी आणि एकादशी या दोन दिवशी अन्नदान वाटप करण्यात आले. सदरचे अन्नदान हे कोर्टी रोडवरील पाटील ट्रॅक्टर्स या ठिकाणी करण्यात आली आषाढी वारी निमित्त अन्नदान करण्याची प्रथा ही गेले अनेक वर्षांपासून चालू आहे तसेच ही परंपरा यापुढे कायम सुरू ठेवण्यात येणार आहे. या ठिकाणी सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर तालुक्यातील श्रीराम आषाढी पायी दिंडी व पालखी सोहळा ही श्रेत्र रामलिंग बेट बहे यांच्या ओबाळवाडी ते पंढरपूर येत असते यांच्यासह या रस्त्यावरून येजा करणारे सर्व भाविकांना मोफत अन्नदान करण्यात आले वरील दिंडीची सोहळ्याची व्यवस्था यापुढे आहे का कायम परंपरा ठेवण्यात येणार आहे अन्नदान वाटपाच्या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते मा. नागेश दादा फाटे मा. संजय बागल बिल्डर्स मुंबई दत्ता कोळेकर संजय भास्कर बागल हरी बागल माणिक मस्के शांतिनाथ अर्जुन बागल डॉक्टर रमेश फाटे प्रमुख संजय तात्या उबाले लखन कोकीळ सुधीर रोकडे विकास भोसले कोल्हापूर जिल्ह्यातील सरपंच दीपांजली संदीप पाटील संदीप बापूसाहेब पाटील रणजीत बागल मनोहर गुजर माजी सरपंच मा मल्हारी खरात महासंचालक मा द्रोणाचार्य के ह भ प बागवान महाराज बागल अभिमन्यू पवार उमेश फाटे निवृत्त भटकर विशाल मोरे शुभम फाटे संतोष पुणेकर समाधान कांबळे उदय आदमीले समाधान बागलयांच्यासह नागेश दादा फाटे मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते

# स्वेरीच्या प्रगती साळुंखे व विजय भड यांची 'त्रिवेणी टर्बाईन' या कंपनीत निवड

**दैनिक यशसिध्दि न्यूज**




पंढरपूर /प्रतिनिधी : 'त्रिवेणी टर्बाईन' या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील प्रगती साळुंखे व विजय भड या विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्ह मधून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली. बेंगलोर येथील 'त्रिवेणी टर्बाईन' या बहुराष्ट्रीय कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील प्रगती सुरेश साळुंखे व विजय दत्तात्रय भड या दोन विद्यार्थ्यांची निवड केली असून त्यांना प्रत्येकी वार्षिक रु. साडेपाच लाख इतके पॅकेज मिळाले आहे. त्रिवेणी टर्बाईन ही स्टीम टर्बाईन क्षेत्रातील एक नामांकित कंपनी आहे. प्रगती साळुंखे व विजय भड या दोघांनी पदवीच्या शिक्षणासाठी स्वेरीचे इंजिनिअरिंग कॉलेज निवडले आणि अत्यंत कष्टाने शिक्षण घेऊन हे यश मिळविले आहे. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्र्वास आणखी दृढ होत आहे. स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंटसाठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरीमध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये ॲप्टिट्यूड, कम्युनिकेशन स्किल, एडवॉन्स टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्यूव, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनिंग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लैंग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील तज्ञ प्राध्यापकांचे व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून निवड झालेल्या विभागातील प्रगती साळुंखे व विजय भड यांचे अभिनंदन केले.

# नाशिकच्या सुपुत्राला युरोपकडून सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील कार्याबद्दल पीएचडी पदवी प्रदान

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नाशिक : इस्टोनिया (उत्तर युरोप) येथील युरो एशियन विद्यापीठाकडून क्रीडा क्षेत्रातील प्रेरणास्त्रोत डॉ.निलेश राणे यांना सामाजिक व क्रीडा क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल पीएचडी (मानद) पदवी नुकतीच जाहीर करण्यात आली होती. २० जुलै रोजी युरो एशियन विद्यापीठामार्फत मुंबई येथे आयोजित पदवीदान समारंभात डॉ.राणे यांना ही पदवी प्रदान करण्यात आली. याच सोहळ्यात डॉ.राणे यांना भारत नागरी गौरव सन्मानाने देखील सन्मानित करण्यात आले. नाशिकच्या तरुणाची सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील ही कामगिरी अतिशय उल्लेखनीय आहे. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि क्रीडा अश्या सर्वच क्षेत्रातून डॉ.निलेश राणे यांच्या कार्याचा गौरव केला जात आहे. युरो एशियन विद्यापीठाकडून डॉ.राणे यांना पीएचडी



(मानद) पदवी जाहीर झाल्यानंतर मा.कृषी व महसूलमंत्री तथा विद्यमान आमदार श्री.एकनाथरावजी खडसे साहेब यांनी मुक्ताईनगर येथे त्यांचा सत्कार केला, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष सौ.रोहिणीताई खडसे यांनी देखील डॉ.निलेश राणे यांची भेट घेत त्यांना पदवी जाहीर झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या होत्या. त्यानंतर हा प्रत्यक्ष पदवीदान समारंभ तुंगा हॉटेल, मुंबई येथे संपन्न झाला.

# निफाड वैनतेय इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा साजरी

निफाडः निफाड येथील न्यायमूर्ती रानडे विद्या प्रसारक मंडळ संचलित वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल येथे गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी सरस्वती पूजन करून विद्यालयातील सर्व शिक्षकवृंदांचे बालगोपाळांनी औक्षण करून गुरुचरणी नतमस्तक झाले व गुरुदेवांच्या आशीर्वाद घेतले यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी गुरुदेवांविषयी आपले मनोगत व्यक्त केले असून गाणी नृत्य सादर केले याप्रसंगी संस्थेचे विश्र्वस्त ॲड वाघावकर तसेच वैनतेय विद्यालयाचे प्राचार्य बी आर सोनवणे इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या पल्लवी सानप तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी वर्ग मोठे संख्येने उपस्थित होते

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळच्या ३७ वा.वर्धापन दिन व श्री गुरुपौर्णिमा उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमा आणि महाप्रसादगृह इमारतीचा भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न

## राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडीओ ग्राफीच्या माध्यमातून भूमिपूजन कार्याला शुभेच्छा दिल्या



### एक दृष्टिक्षेप– नव्याने बांधण्यात येणाऱ्या नियोजित महप्रसादगृहाच्या वास्तूवर

नियोजित महाप्रसाद गृहाची इमारत, भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल. या नवीन नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, या आराखड्याच्या माध्यमातून हे पाहू शकता की, एकूण ५ हजार भाविकांसाठी बसून सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य– भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे. सदर इमारतीचे बांधकाम करण्याची पुर्वतयारी झाली असुन, ही सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज व प्रशस्त इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकार होणार आहे. या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ६० कोटी, इतका अपेक्षित आहे. सदर इमारतीस नगरपालिकेची रीतसर बांधकाम परवानगी घेतली आहे आणि अल्पावधीतच या इमारतीचे बांधकाम सुरू होत आहे.

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त, सद्गुरु श्री स्वामी समर्थ महाराज की जय..! श्री अन्नपूर्णा देवी, श्री लक्ष्मी नारायण नामाच्या जयघोषात, संपूर्ण देशात अन्न हे पूर्णब्रह्माची साक्ष देणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ या धर्मादाय न्यास संस्थेचा ३७ वा. वर्धापन दिन व श्री गुरुपौर्णिमा उत्सव विविध धार्मिक कार्यक्रमा बरोबरच रु. ६० कोटीच्या नियोजित ५ मजली भव्य अशा महाप्रसादगृह इमारतीचा भूमिपूजन सोहळा रविवारी मोठ्या थाटात व उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडीओ ग्राफीच्या माध्यमातून भूमिपूजन कार्याला शुभेच्छा दिल्या. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या असीमकृपेने, न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शन, प्रमुख उपस्थितीत व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळ हे ३७ व्या वर्षात यशस्वी पदार्पण करुन नेत्रदीपक वाटचाल करीत आहे.

दरम्यान गुरूपौर्णिमे निमित्त सकाळी ७ ते ९ श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण, सकाळी ९ ते १० नामस्मरण, जप व श्री गुरूपूजा संपन्न झाले. अन्नछत्र मंडळाच्या नियोजित ५ मजली भव्य अशा महाप्रसादगृह इमारतीचा भूमिपूजन समारंभ – श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे मुख्य पुरोहित मोहन पुजारी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, राज्य अधिस्वीकृती समिती, महाराष्ट्र शासनाचे अध्यक्ष व मुंबईचे जेष्ठ पत्रकार श्री व सौ. यदुभाऊ जोशी, कायदेविषयक सल्लागार व जेष्ठ विधिज्ञ अँड. नितीन हबीब सोलापूर, अखिल मंडई मंडळ पुणेचे अध्यक्ष व न्यासाचे विश्र्वस्त जनार्दन उर्फ अण्णा थोरात, श्री व सौ अनिल पाटील ठाणे, प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले, कैलास वाडकर (देणगीदार व पालखी संयोजक शिरवळ, पुणे), अतुल शिंदीकर (देणगीदार, ठाणे प.) शिवसेना संपर्क प्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे, काँग्रेसचे शितलताई म्हेत्रे, बाळासाहेब दाभेकर, आबा बालगुडे, आरतीताई लिंगायत, निरंजन दाभेकर, प्रवीण मोरे माथेरान आदि मान्यवरांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना आमदार कल्याणशेट्टी यांनी म्हणाले की, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे राज्यातील एकमेव असे महाप्रसादालय आहे की, यथाशक्ती देणगीतून गेल्या ३७ वर्षापासून अविरत सुरु आहे. भक्तांना देणगीबाबत कोणतेही बंधन नाही. अन्न हे पूर्ण ब्रह्मांची साथ देणारे मंडळ आहे. या महाप्रसादाने आत्मा तृप्त होतो व मोठे समाधान मिळते. मंडळाच्या वर्धापन दिनास शुभेच्छा व उत्तरोत्तर मंडळाचे प्रगती व्हावे ही श्रीचरणी प्रार्थना अशा शुभेच्छा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिले. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांनी अन्नछत्र मंडळास आजवर सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार व्यक्त केले. पुढे देखील प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाची टीम प्रगतीची यशस्वी घोडदौड सुरूच ठेवली आहे. याचा मला आनंद आहे. असे सांगून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याबरोबरच माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, राज्य अधिस्वीकृती समिती, महाराष्ट्र शासनाचे अध्यक्ष व मुंबईचे जेष्ठ पत्रकार यदुभाऊ जोशी यांनी देखील शुभेच्छा व्यक्त केल्या.

या विविध कार्यक्रमास न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, भाऊ कापसे, विश्र्वस्त राजेंद्र लिंबीतोटे, अप्पा हंचाटे, लक्ष्मण पाटील, संतोष भोसले, लाला राठोड, डॉ.प्रसाद प्रधान, केदारनाथ बेंगळूर,

संदीप फुगे–पाटील, अँड.संतोष खोबरे, ओंकारेश्र्वर उटगे, मनोज निकम, अरविंद शिंदे, प्रविण देशमुख, दिलीप सिद्धे, किशोर सिद्धे, अभियंता किरण पाटील, अमित थोरात, श्रीकांत झिपरे, रोहित खोबरे, वैभव मोरे, सौरभ मोरे, संजय गोंडाळ, राजाभाऊ नवले, निखिल पाटील, प्रवीण घाटगे, रामचंद्रराव घाटगे, पिंटू दोडमनी, गणेश भोसले, रमेश हलसंगी, संतोष माने, पिंटू साठे, गोटू माने, अविनाश मडीखांबे, केदार माळशेट्टी, अभिजित लोकापुरे, रोहन शिर्के, योगेश पवार, अप्पा हंचाटे, राजकुमार झिंगाडे, राजेश भोसले, केदार तोडकर, गोविंद शिंदे, सागर याळवर, संजय गोंडाळ, केदार जाधव, अतिश शिंदे, सागर शिंदे, नागेश कलशेट्टी, रमेश केत, मैनुद्दीन कोरबु, शबाब शेख, दत्ता माने, बाळू पोळ, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, शहाजीबापू यादव, कल्याण देशमुख, चंद्रकांत हिबारे, धानप्पा उमदी, सिध्दाराम कल्याणी, एस.के.स्वामी, राजेंद्र पवार, प्रसाद हुल्ले, बाळासाहेब घाडगे, सिद्धेश्र्वर हत्तुरे, स्वामिनाथ बाबर, योगेश पवार, सागर शिंदे, पिंटू साठे, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, राहुल इंडे, सुमित कल्याणी, विराज माणिकशेट्टी, पै.महेश कुलकर्णी, पै.मौला शेख, सरफराज शेख, शिवराज स्वामी, अतिश पवार व त्यांची टीम यांच्यासह आदीजण उपस्थितीत होते.

गुरुपौर्णिमेनिमित्त श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात असलेले यात्रीनिवास, यात्रीभुवन गेल्या दोन दिवसापासून हाऊसफुल्ल झालेले होते. मंडळाने पार्किंगची व्यवस्था चोख केलेली होती. राज्यासह परराज्यातील लाखो भाविकांनी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात महाप्रसादाकरिता गर्दी झालेली होती. गेल्या ११ दिवसापासून श्री गुरु पौर्णिमा व ३७ व्या वर्धापन दिनानिमित्त धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, किर्तन या कार्यक्रमासह गुरुपौर्णिमेच्या दिवशी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांनी महाप्रसाद भक्तांना वाटप होण्याकरिता नेटके नियोजन केलेले होते. विधिवत पूजा न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पु पुजारी, विश्र्वसंभर पुजारी व संजय कुलकर्णी, सोमकांत कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचलन श्र्वेता हुल्ले यांनी तर व आभार सचिव शामराव मोरे यांनी मानले.

**शेकडो भक्तांनी केले रक्तदान : गेल्या ११ दिवसापासून श्री गुरु पौर्णिमा व ३७ व्या वर्धापन दिनानिमित्त सोलापूर येथील विविध रक्तपेढीने अन्नछत्र मंडळात आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये शेकडो स्वामी भक्तांनी रक्तदान केले.**

**चोख बंदोबस्त : श्री गुरु पौर्णिमा व ३७ व्या वर्धापन दिनानिमित्त पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी चोख पोलीस बंदोबस्त मंदिर व न्यासाच्या परिसरात लावण्यात आला होता.**

**न्यासाचे नेटके नियोजन : बाहेर गावामधून आलेल्या वाहनांची मैंदर्गी, बसलेगाव, व शहरातील मुख्य रस्त्यावर वाहनांची दुतर्फा गर्दी होत होती. हे लक्षात घेऊन न्यासाच्या मैंदर्गी रस्त्यावरील गेटने भाविकांना बाहेर जाण्यासाठी रस्ता मोकळा करण्यात आल्याने वाहनांच्या गर्दीवर नियंत्रण आल्यामुळे वाहनांची गर्दी कमी झाली. न्यासाने पार्किंगची व्यवस्था चोख केलेली होती. नेहमीच भक्तांना सुविधा देण्यामध्ये न्यास हे अव्वल असून भक्तांना कोणत्याच अडचणी येता कामा नये आशा उपाययोजना व दक्षता घेत असल्याने भक्तांना सुखकर पद्दतीने महाप्रसादाचा लाभ मिळाला.**

**श्री क्षेत्र अक्कलकोटचे नांव सातासमुद्रापार : महाराष्ट्रसह कर्नाटक, आंध्र, तेलंगणा, गोवा, मध्यप्रदेश, केरळ, तमिळनाडू, गुजरात, दिवदमन, उत्तराखंड, काश्मीर पंडित व दिल्ली याबरोबरच राजस्थान, उत्तर प्रदेश व बिहार या राज्यासह विदेशातून लाखो भाविकांनी न्यासाचे ३७ वा. वर्धापनदिन व गुरुपोर्णिमेच्या निमित्त श्रीक्षेत्र अक्कलकोट येथे येऊन श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाबरोबरच अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचा लाभ घेतेले.**

**नवीन उर्जा देणारे अन्नछत्र :** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र हे गेली ३६ वर्षे निरंतर जपले आहे. ३७ व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमास शुभेच्छा..! आजच्या गुरुपोर्णिमेच्या दिवशी ५ मजली निवासी इमारतीचे भूमिपूजन कार्य वटवृक्षासारखी विस्तारित असल्याची साक्ष देणारे आहे. प्रत्यक्ष उपस्थिती काही कारणाने येणे जमले नांही. परंतु या विधायक कार्याला माझ्या शुभेच्छा..! न्यासाकडून श्रीक्षेत्र अक्कलकोटच्या विकासासाठी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. न्यासाचे सामाजिक कार्य देखील उल्लेखनीय आहे. वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन ही बाब अत्यंत प्रशसनीय आहे. न्यासाच्या कामाच्या उल्लेख करायचा तर वेळ अत्यंत अपुरा पडेल. न्यासाच्या पदाधिकारी, सदस्य,सेवेकरी, कर्मचारी यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस माझ्या शुभेच्छा ..! सदर कार्यक्रम प्रसंगी ना. देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडीओ ग्राफीच्या माध्यमातून भूमिपूजन कार्याला वरील शुभेच्छा दिल्या.
**–ना. देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

**लाखो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात दैनंदिन दोन्ही वेळेस मोफत महाप्रसादाची सोय, भक्तांच्या यथाशक्तीच्या देणगीवर सुरू आहे. दररोज २५ हजार तर सण, वार, उत्सव, दर गुरूवारी, संकष्टी चतुर्थी, एकादशी व गुरुपोर्णिमेच्या दिवशी १ लाखाहून अधिक भाविक महाप्रसादाचा लाभ घेतला.**

## श्री विठ्ठल निर्मिती दिंडी पुरस्काराचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या हस्ते वितरण



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/ प्रतिनिधीः आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या मार्फत आषाढी यात्रेतील सर्व सोहळ्यातील बऱ्याच दिंड्या हे सर्व कार्य करत आहेत त्यांच्या कार्याचा उचित असा सन्मान व्हावा त्याचप्रमाणे इतर दिंडी नाही याचा आदर्श घेऊन या निर्मल वारी हरिद्वारी अभियानामध्ये सहभाग घ्यावा या जाणिवेतून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या मार्फत आषाढी यात्रा कालावधी श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार सन २०१८ पासून सुरू करण्यात आला आहे

यामध्ये श्री संत तुकाराम महाराज वंशज देहूकर दिंडी यांना एक लाख रुपयांचा प्रथम पुरस्कार दानेवाला निकम दिंडी यांना ७५ हजाराचा द्वितीयपूर क्रमांकाचा पुरस्कार श्री गुरु बाबासाहेब आजरेकर दिंडी यांना ५०००० क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला यावेळी मंदिर समितीचे आरोग्य दूध पुस्तकाचे प्रकाशाने माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाला या प्रसंगी मंदिर समितीचे अध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर श्री विठ्ठल निर्मिती पुरस्कार समितीचे अँड माधवीताई निगडे ह भ प भास्कर जवंजाळ उच्च मित्र ह भ प शिवाजीराव मोरे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील मंत्री दीपक केसरकर मंदिर समिती सदस्य शकुंतला नडगिरे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके वारकरी बंधू व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्यांच्या दर्जोन्नतीसाठी ५६ कोटींचा निधी मंजूर : आ.आवताडे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मंगळवेढरा/प्रतिनिधीः पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील खराब रस्त्यांसाठीच्या कामासाठी एकूण ५६ कोटी रुपये एवढ्या निधीला मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातून प्रशासकीय मान्यता मिळाली असून हे खराब झालेले रस्ते दर्जोन्नती होऊन दळणवळणास अधिक चांगले रस्ते उपलब्ध होणार असल्याची माहिती मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे.



मंजूर झालेले रस्ते आणि मिळालेला निधी पुढीलप्रमाणे – मंगळवेढा ते दामाजी कारखाना या आठ किलोमीटर रस्त्यासाठी १३ कोटी ८१ लाख रुपये, अरळी ते नंदूर या पाच किलोमीटर रस्त्यासाठी ९ कोटी ८० लाख रुपये, भोसे ते वाघमोडेवाडी या तीन किलोमीटर रस्त्यासाठी ५ कोटी ६३ लाख रुपये, भाळवणी ते जित्ती या सहा किलोमीटर रस्त्यासाठी ८ कोटी ६६ लाख रुपये, महमदाबाद (शे) ते आंधळगाव या सात रस्त्यासाठी किलोमीटर १० कोटी ६५ लाख रुपये तसेच पंढरपूर तालुक्यातील कासेगाव ते तावशी या पाच किलोमीटर रस्त्यासाठी ७ कोटी ७१ लाख रुपये अशा एकूण ६ रस्त्यांसाठी ५६ कोटी रुपये एवढ्या निधीसाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

मतदारसंघातील अनेक रस्त्यांच्या दुरावस्थेच्या पार्श्र्वभूमीवर ते रस्ते दुरुस्त करण्यासाठी आमदार समाधान आवताडे हे सतत प्रयत्नशील असून यापूर्वीही त्यांनी तालुक्यातील रस्ते विकास व दुरुस्तीच्या कामासाठी केंद्र सरकार व महाराष्ट्र राज्य शासनाकडून विविध योजने अंतर्गत कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला आहे.

गेल्या दोन वर्षांपासून महायुतीचे सरकार आल्यापासून रस्ते व इतर विकास कामांसाठी आमदार आवताडे यांच्या माध्यमातून पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणावर विकास निधी उपलब्ध झालेला आहे. सदर निधीच्या तरतुदीमुळे पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण रस्ते हे सिमेंट काँक्रीटचे बनणार असून यामुळे ग्रामीण भागातील दैनंदिन दळणवळण सुविधा आणखी गतिमान आणि व सुलभ होण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

सदरील कामे मंजूर करण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.चंद्रकांत दादा पाटील, ग्रामविकास मंत्री ना.गिरीष महाजन व इतर संबंधित विभागाशी सतत पत्रव्यवहार करून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. वरील सर्व नियोजित रस्ते विकास कामांसाठी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या माध्यमातून कोट्यावधी रुपये निधी मंजूर झाल्याने आमदार आवताडे यांनी राज्य सरकारचे मतदारसंघाच्या वतीने व नागरिकांच्या वतीने जाहीर आभार व्यक्त केले आहेत.

**खराब झालेल्या रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांचे प्रयत्नांतून ग्रामीण भागातील जनतेच्या दळणवळण सुविधेचा विचार करून पायाभूत सुविधांमध्ये वाढ होण्यासाठी हा निधी अतिशय महत्त्वपूर्ण आहे. या निधीतून नियोजित असणाऱ्या रस्ते विकास कामांमुळे सतत या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मतदारसंघातील अनेक विकासात्मक बाबींवर भरीव निधी खेचून आणणारे आ आवताडे यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रस्ते आता चकाचक होतील – रमेश भांजे– माजी उपसभापती पं.स,मंगळवेढा)**

## पंढरपूर सिंहगड कॉलेजच्या अक्षय नागणे यांची तीन कंपनीमध्ये निवड



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात चतु तर वर्षात शिक्षण घेत असलेले आंधळगाव तालुका मंगळवेढा येथील अक्षय सुनील नागणे यांची तीन कंपनीत निवड झाली असल्याची माहिती इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. विनोद कुमार मोरे यांनी दिलीकोर्टी तालुका पंढरपूर येथील एस के एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात शेवटच्या वर्षात शिक्षण घेत असलेले अक्षय नागणे यांची मुंबई येथील करमतरा इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड वार्षिक पैकी २.४० लाख इन्फिनिटी सेशन अँड सोल्युशन पुणे वार्षिक पॅकेज २.८० लाख आणि फारसा प्राइवेट लिमिटेड वार्षिक पॅकेज तीन लाख आणि तीन कंपनीत निवड झाली असून फारसा रोबोटिक्स प्रायव्हेट लिमिटेड ही पुणे येथील रोबोटिक वेल्डिंग सेल वेल्डिंग मशीन आणि इन्स्पेक्शन गेज इत्यादींचे उत्पादकता कंपनी आहे अशा कंपनीत अक्षय नागणे हे जून २०२४ मध्ये रुजू झाले आहेत

अशी नाही यांची तीन कंपनीमध्ये निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास कारंडे व उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. समीर कटेकर डॉ. चेतन पिसे डॉ. भालचंद्र गोडबोले डॉ. श्याम कुलकर्णी डॉक्टर गणेश कदम डॉक्टर संपत देशमुख डॉक्टर अल्ताफ मुलानी डॉक्टर बाळासाहेब गंधारे डॉ. अतुल आराधे डॉक्टर गारगोटी डॉक्टर सोमनाथ कोळी सुभाष पिंगळे प्रा. अभिजीत सव्वाशे प्रा दत्तात्रय कोरके आधीच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक कर्मचारी इत्यादींनी अभिनंदन व शुभेच्छा दिल्यार